E-ISSN No : 2454-9916

Impact Factor : 7.058

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# *Certificate of Publication*

*Is hereby awarding this certificate to*

*Prof./Dr. /Mr./Mrs./Miss.* सखाराम बाबाराव कदम

**International Education and Research Journal**

*In recognition of the publication of the paper entitled*

*Title"* भारतीय ज्ञान व्यवस्थेचे नवीन शैक्षणिक धोरणातील उपयोजन "

*Published with Peer-Reviewed (Refereed) Journal in*

*Volume - 9, Issue - 10, October 2023*

*Editor in Chief*

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

IERJ

Research Paper | Education | E-ISSN No : 2454-9916 | Volume : 9 | Issue : 10 | October 2023

# 'APPLICATION OF INDIAN KNOWLEDGE SYSTEM IN NEW EDUCATION POLICY'
# ('भारतीय ज्ञान व्यवस्थेचे नवीन शैक्षणिक धोरणातील उपयोजन')

**प्रो. सखाराम बाबाराव कदम**

सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी

जून 2023 पासून नवीन शैक्षणिक धोरण लागू होते आहे. या नविन शिक्षण धोरणात भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक अंगांना स्पर्श करणारी व आपल्याच पूर्वपरंपरेशी जोडून घेण्याची भूमिका प्रकर्षाने येथे दिसून येते. म्हणून या लेखाचा घाट घातला आहे.

भारतीय ज्ञान व्यवस्था जगातील सर्वात प्राचीन ज्ञान व्यवस्था म्हणून ओळखली जाते. हे ज्ञान कधी 'आस्तिक' तर कधी 'नास्तिक' या किंवा 'वैदिक' व 'अवैदिक' अशा दोन नावाने सुद्धा ओळखले गेले आहे. प्राचीन काळी न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, मिमांसा, वेदांत, जैन – बौद्ध, लोकायत...इत्यादी अष्टदर्शने नावाने ओळखले गेले आहेत. यापैकी चार 'आस्तिक' व उर्वरित चार 'नास्तिक' दर्शने म्हणून ओळखले जातात. या विचारधारेचा आजही देवनागरी लिपीमध्ये लिहिल्या जाणाऱ्या प्रत्येक भाषेवर अभूतपूर्व असा पगडा आहे.

मराठी भाषा ही सुद्धा देवनागरी लिपी मध्ये लिहिली जाणारी प्रमुख भाषा म्हणून ओळखली जाते. मराठी भाषेत सुद्धा या भारतीय ज्ञान परंपरेचा खोलवर प्रभाव असल्याचे सहज बघतांना लक्षात येते. मराठी भाषा संस्कृत आतून आली असल्यामुळे भारतीय साहित्यविचार हाच देवनागरी लिपीतील प्रत्येक भाषेसाठी महत्त्वाचा मानला गेलेला आहे. यामध्ये काव्यलक्षणे, काव्य प्रयोजने, रस सिद्धांत आदींचा उल्लेख प्रकर्षाने करावा लागतो.

### १) मराठी साहित्यविचार (च्मजपबे) वरील भारतीय ज्ञान व्यवस्थेचा प्रभावः

मराठीत अजूनही काव्यलक्षणे सांगताना अलंकार दृ (भामह, वामन, कुंतक), वक्रोक्ती (कुंतक), रीतीविचार (वामन), औचित्यविचार (क्षेमेंद्र), रसविचार (विश्वनाथ) व ध्वनीविचार (आनंदवर्धन) या प्रमुख सहा तत्वांशिवाय पुढे जाताच येणार नाही. एवढे अभिन्नपणे ते जोडले गेले आहे.

काव्यप्रयोजने सांगताना सुद्धा संस्कृतातील मम्मटाने सांगितलेली काव्यकारिका लक्षात घ्यावी लागते. "काव्यं यशसे, अर्थकृते, व्यवहारविदे, शिवेतरक्षतये, सद्यपर निवृत्तये, कांतासम्मिततयोपदेश युजे" ही सहा प्रयोजने महत्त्वाची मानले जातात. याशिवाय भरताने मांडलेला रससिद्धांत हा "विभावानुभावसंयोगाद्रसनिष्पत्ती" विभाव, अनुभाव व व्याभिचारी भावांनी रसनिष्पत्ती होते, असे हा श्लोक सांगतो. यावर पुढे भट्टलोलट, श्रीशंकूक, अभिनव गुप्त आदी मीमांसकांनीही विचार केला आहे. पाश्चात्त्याचा 'साहित्यविचार' व भारतीयांचा 'रीतिविचार' यामध्ये गुणात्मक फरक असल्याचे अभ्यासांती सिद्ध झाले आहे. भारतीय ध्वनीसिद्धांतानुसार व्यंग्यार्थाला जास्त महत्त्व आहे.

### २) संत साहित्यातून होत असलेला भारतीय ज्ञान परंपरेचा संस्कारः

मराठी भाषेत संतसाहित्य हे मध्ययुगीन समाजाची सामाजिक, आर्थिक व नैतिक घडण करणारे महत्त्वाचे साहित्य मानले जाते. तुकोबांचे अभंग अशिक्षित गाव खेड्यातील वारकऱ्यांना जसे भावतात तेवढेच व त्यापेक्षा अधिक सुशिक्षितांना सुद्धा एका जागी खिळवून ठेवतात. वैदिक कर्मकांडांना कंटाळून संतांनी लोकभाषेत सामान्य जणांना उपदेश केला. त्यामुळेच इस्लामी काळातही पराभूत मराठी मन आणि मानसिकतेला जगण्याचे तात्विक अधिष्ठान संतांनी मिळवून दिले. यामध्ये संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहून वैदिक कर्मकांडा विरोधात बंडाचा झेंडा पहिल्यांदा खांद्यावर घेतला हे कदापी विसरता येणार नाही. संत नामदेव यांनी भारतभर तीर्थयात्रा करत भागवत धर्माचा प्रचार आणि प्रसार केला. संत चोखामेळा यांनी दलितत्त्वाची वेदना सहजपणे मंडप येथील भेदभावाच्या भिंती स्पष्ट केल्या. संत बंका महार, संत सावता माळी यांनी आपल्या करमतच ईश्वर पाहण्याची किमया करून दाखवली. संत नरहरी सोनार यांनी हरी आणि हर यातील द्वैत संपवले, संत गोरा कुंभार समर्पण भक्ती शिकवली. या अठरापगड जातीतील संतमेळा असू देत किंवा संत जनाबाई, संत कान्होपात्रा, संत सोयराबाई, संत मुक्ताबाई यासारख्या संत स्त्रिया यांनी मानवी जगण्याला हितकारक अभंग लिहिले. जनाबाई व मुक्ताबाई च्या भूमिका तर स्त्री स्वातंत्र्याचा स्वतंत्र उद्‌गार आहेत. समन्वयकार संत एकनाथांनी संस्कृत व मराठी भाषेत समन्वय, विद्वान व अशिक्षित, अडाणी माणसातील समन्वय, नाथ संप्रदाय व वारकरी संप्रदायातील समन्वय साधत येथे अद्वैत भक्तीची शिकवण दिली व 'अनाथांचे नाथ तेचं एकनाथ' लोकशिक्षक ठरले. संत तुकाराम यांच्या अभंगवाणीतून सामाजिक समतेची शिकवण, स्वानुभवातून आलेले दाहक वास्तव तुकोबांनी सहज सुलभ भक्ती मार्गातून अभंगवाणी द्वारे निरूपण केले. म्हणूनच महाराष्ट्र ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते.

येथे जेवढे संत होऊन गेले. त्यांनी मराठी मनाला अध्यात्म मार्गाची जोड लावत पंढरीचा विठ्ठल हे आराध्य दैवत मानून, गळ्यात तुळशीची माळा, कपाळी अष्टगंधाचा टिळा, खांद्यावर भगवी पताका घेऊन पंढरीची आषाढी कार्तिकी वारी सुरू केली. अध्यात्मिक क्षेत्रापुरती का होईना सामाजिक समता खऱ्या अर्थाने येथे प्रस्थापित झाल्याचे दिसते. यामुळे मराठी मनाला जगण्यास तात्त्विक बळ मिळाले. संतांनी अस्सल देशीयतेचा संदर्भ जोडून केलेल्या अभंगरचना, भारुडे, गवळणी, पदे, श्लोक, आरत्या, भूपाळ्या यामुळे मराठी मन संसारात राहूनही परमार्थ करण्यास तयार झाले. हे भारतीय ज्ञान व्यवस्थेचे फलित मानावे लागेल.

### ३) वैचारिक साहित्यावरील भारतीय ज्ञान व्यवस्थेचा प्रभावः

विशेषत्वाने लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे वैदिकांच्या कर्मकांड, अंधश्रद्धा, यज्ञाचे अवास्तव महत्त्व, त्यापायी सामान्य जनांचे होणारे शोषण या सर्व गोष्टींना कंटाळून अवैदिकांनी म्हणजेच जैन, बौद्ध, शैव व लोकायत मतानुयायांनी भारतीय माणसाचे ऐहिक जगणे महत्त्वाचे मानले व नव्या तत्त्वज्ञानाची मुहूर्तमेढ रोवली. जे तत्त्वज्ञान फक्त माणसाच्या ऐहिक प्रगतीला महत्त्व देते. पारलौकिक जगण्याचा विचार सोडून, पाप पुण्याच्या संकल्पनेला नाकारून, यज्ञ, होम आदी बाबींना फाटा देत केवळ आणि केवळ मनुष्य हितकारक स्वीकारून आलेले हे वैचारिक साहित्य मराठी मनावर दीर्घकाळ परिणाम करते झाले. यामध्ये संत बसवेश्वर, संत मन्मथ स्वामी यासारखे शैव उपासक, चार्वाकासारखा प्रत्यक्ष प्रमाणपद्धती प्रमाण मानणारा, प्रखर तर्कनिष्ठ, विज्ञाननिष्ठ, बुद्धिप्रामण्यवादी मीमांसक, अनेक जैन मुनि व प्रत्यक्ष अहिंसेचे उपासक वर्धमान महावीर, सर्वोत्तम भूमिपुत्र तथागत भगवान बुद्ध, संत कबीर, आदींचा विचार येथे करावा लागतो. याशिवाय पुढील काळातील महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचाही या अवैदिक वैचारिक लेखनात महत्त्वपूर्ण सहभाग राहिला आहे. यातून भारतीय ज्ञान व्यवस्थेचे परिष्कृत स्वरूप दिसून येते.

### ३) लोकसाहित्यातून भारतीय ज्ञान व्यवस्थेचा झालेला सहज शिकवणीचा संस्कारः

मराठी मन आणि मानसिकतेला अक्षरओळख होण्यापूर्वी सुद्धा एक नैतिक शहाणपण शिकवणारी पाठशाळा म्हणून लोकसाहित्याकडे बघावे लागेल. हे ज्ञान माणूस एका

Copyright© 2023, IERJ. This open-access article is published under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial 4.0 International License which permits Share (copy and redistribute the material in any medium or format) and Adapt (remix, transform, and build upon the material) under the Attribution-NonCommercial terms.

E-ISSN No : 2454-9916 | Volume : 9 | Issue : 10 | October 2023

पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जे सहज देत होता. ह्या सांस्कृतिक संचिताचे वहन आपोआप होत होते कधी लोककथा, लोकगीते व लोककथागिते आदी शाब्द अविष्कारातून लोकांचे रंजन करण्याबरोबरच काही नैतिक उपदेश लोकसाहित्याने केला व भारतीय ज्ञानाला सन्मानित केले.

स्त्रियांची गाणी जसे अंगाई गीते, जात्यावरची गाणी, सण उत्सवाची विविध गीते, म्हणी, उखाणे, प्रहेलिका, वाक्प्रचार...आदी शाब्द साहित्यातून भारतीय मनाला विधायक वळण देण्याचे, नैतिक संस्कार करण्याचे प्रयत्न लोकसाहित्याने नेहमी केले. या साहित्याचा कर्ता जरी अनामिक असला तरी एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे हा सांस्कृतिक वारसा आपोआप जतन करून संक्रमित केल्या जातो. लोकसाहित्यातील दुसरा महत्त्वपूर्ण विभाग म्हणजे लोकप्रयोज्य कलांचा होय. यामध्ये गोंधळ, वासुदेव, जागरण, भराड, लळीत, किर्तन, भारुडे आदी लोककलावंतांनी आपल्या बहूसांस्कृतिक वारशाचे जतन करण्याबरोबरच भारतीय ज्ञान परंपरेचे वहन सहजपणे केले आहे.

### ४) भारतातील प्राचीन उपचार पद्धती:

प्राचीन भारतीय ग्रंथातून जखमी सैनिकांवर उपचार करण्यासाठी, आजारी माणसांच्या दीर्घ व्याधी निवारण करण्यासाठी, अनेक छोट्या मोठ्या आजारांवर उपचार करण्यासाठी काही उपचार पद्धती अस्तित्वात होत्या. याला आज आयुर्वेद, होमिओपॅथी, निसर्गोपचार, युनानी, ॲक्युप्रेशर थेरपी इत्यादी वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते.

आपल्याकडे जुन्या काळापासून उपलब्ध असलेली 'सुश्रुत संहिता' ही रोगी माणसाची काळजी कशी घ्यावी ते शिकवते. तर 'चरक संहिता' औषधी वनस्पती, तिचे गुणधर्म, सोबतच शरीरांतर्गत छोटे मोठे ऑपरेशन्स कसे करावे याविषयी सुद्धा काही पद्धती विकसित करत असल्याचे दिसून येते. भलेही या ज्ञानाचे परिष्करण पुढे झाले नाही किंवा मेकॉलेच्या शिक्षण पद्धतीने हे सगळे बाजूला ठेवले म्हणून आपण या प्राचीन ज्ञानसाठ्यापासून सलग दोन – तीनशे वर्ष अलिप्त राहिलो. त्यामुळे त्या ज्ञानाचा अध्यायावत विकासही खुंटल्या गेला. तो आता नवीन शैक्षणिक धोरणाने प्रवाहित होत असेल तर आनंदच आहे.

### ५) भारतातील व्यावसायिक ज्ञानाचे शिक्षण:

परकीय सत्तेच्या अंमलापूर्वी भारतातील शेती सुपीक होती. शेतीची प्रतवारी करण्यात येऊन त्यानुसार पिके घेतली जात होती. अनेक मसाल्याचे पदार्थ भारतात तयार होत असत. गुरुकुलातील विद्यार्थ्यांची आवड लक्षात घेऊन त्या त्या प्रमाणे त्यांना शिक्षण घेण्याची मुभा गुरु देत असत. शेती शिक्षण, सैनिकी शिक्षण, बांधकामाचे शिक्षण, आरोग्य शिक्षण इ. सर्वात ज्ञानी विद्यार्थी तो गुरु बनून गुरुकुलाचा वारसदार राहत असे. त्यामुळेच मोठ मोठे गड किल्ले उभारणारे, विविध ठिकाणी पाणी अडवून धरण तयार करणारे, पूल उभारणारे, वेगवेगळ्या आकाराची व आकर्षक रचना असलेली मंदिरे बांधणारे कारागीर व कुशल अभियंते नक्कीच प्राचीन भारतात असतीलचं की.. मानवी जगण्याच्या शंभर वर्षाच्या आयुर्मर्यादेत प्रत्येक बालकाचा सुरुवातीचा टप्पा हा त्याच्या आवडीनुसार शिक्षण घेण्यात व्यथीत करून कुशल मनुष्यबळ तयार करणारी गुरुकुल पद्धती केवळ हेटाळणीचा विषय कशी काय ठरू शकते? याच कारणांचा शोध घेताना आपणास त्याविषयी पूर्ण माहिती नसणे हेच अज्ञान दिसून येते. याच गुरुकुलातून तयार होणारी दंडसंहिता राजा अमलात आणत असे. लोकांच्या कर प्रणालीचे निर्धारण गुरुकुलातून होत असे. राजांची कर्तव्य व प्रजेच्या जबाबदाऱ्याही येथेच निश्चित होत असत. जगण्याची मार्गदर्शक तत्वे, सैनिकांची कर्तव्य आणि जबाबदाऱ्या येथेच शिकवल्या जात असत.

त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणातून असे काही सकारात्मक दृष्टिकोन विकसित होणार असतील तर नक्कीच नव्या शैक्षणिक धोरणाचे स्वागत करणे उचित ठरेल. पण याचा अर्थ पाश्चात्य शैक्षणिक धोरणातील विधायक बदल पूर्ण आपले नाहीत म्हणून टाकून द्यावेत असा मात्र कोणीही घेऊ नये. डार्विन चा उत्क्रांतीवाद अमान्य करण्यास आमच्याकडूनही संमती नाही. पाश्चात्य व पौर्वात्य ज्ञानाचा एकमेकांच्या हाती हात देत योग्य समन्वय साधण्याचे आव्हान मात्र तितक्याच जिकिरीने आपण सर्व शिक्षकांनी पेलावे लागणार आहे. विज्ञानाची अध्यात्माशी सांगड घालताना मन, बुद्धी आणि भावनेचा विकास साधत आपणास पुढे जावे लागणार आहे. तर आणि तरच नव्या शैक्षणिक धोरणातून काही अनोखी उद्दिष्टे साध्य होतील असा आशावाद करण्यास हरकत नसावी.

### सारांशः

भारतीय ज्ञान व्यवस्था ही ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद या चार वेदांमुळे वैदिक काळापासून प्रचलित झाली आहे. भारतीय पुरातत्त्व विभागाने उत्खननातून शोधलेल्या मोहनजोदडो, हडप्पा संस्कृती ह्या प्राचीन सभ्य समाजाच्या द्योतक आहेत. पुढील काळात १०८ उपनिषदे, ब्राह्मण्यके, आरण्यके, श्रुती स्मृती, लोकायत विचार, बौद्ध, जैन विचार अशा पद्धतीने भारतीय ज्ञान परंपरेचा येथे विकास होत गेल्याचे दिसते. यातीलचं निवडक तत्त्वे अंगीकारत ही नवीन शिक्षण पद्धती लागू होणार असेल तर तिचे स्वागत करायला शिक्षक म्हणून आम्ही सुद्धा दोन पाऊल पुढे येण्यास तयार आहोत.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)